## संस्थेच्या स्थापने विषयी थोडेसे :

आपली संस्था अस्तित्वात येण्यापूर्वी सर्व न्यायालयीन बांधव सातारा जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतसंस्था या संस्थेचे सभासद होते. या संस्थेत महसूल, आरोग्य, कोषागार आणि न्याय विभागातील शासकीय कर्मचारी सभासद होते. प्रत्येक विभागातील दोन–दोन कर्मचारी घेऊन संचालक मंडळ तयार केले जात असे. न्यायविभागातून मात्र कर्मचाऱ्यांना कसलीच कल्पना न देता वरिष्ठ प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनाच संचालक पदावर पाठविण्यात येत असे. त्यामुळे न्यायालयातील इतर कर्मचाऱ्यांना संचालक मंडळावर स्थान आणि संधी मिळत नसे. ही वस्तुथिती अस्वस्थ करणारी होती.

इतर विभागातील सभासद कर्मचारी कर्जाचे हफ्ते वेळेवर व वक्तशीरपणे परतफेड करीत नसत. त्यांच्यावर वसुलीची कारवाई न करता त्या त्या विभागातील संचालक हे त्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालीत असत. त्यामुळे महिन्याकाठी होणाऱा निधी कर्जवाटपासाठी अपूरा पडत असे. परिणामस्वरूप न्यायविभागातील कर्मचाऱ्यांची मासिक वसूली शंभर टक्के असतानाही न्यायालयीन कर्मचाऱ्यांना वेळेवर कर्ज मिळत नसे.

त्यात आणखी भर म्हणजे सन् १९९७ – ९८ साली पहिल्यांदाच सातारा जिल्हा सरकारी नोकरांची पतपेढी या संस्थेची निवडणूक झाली. न्यायालयीन संघटनेने पुरुस्कृत केलेल्या उमेदवारांच्या पॅनलच्या प्रचारप्रमुखाची जबाबदारी संघटनेचे तत्कालीन उपाध्यक्ष श्री शब्बीर शेख यांच्यावर सोपविण्यात आली. त्यामुळे त्यांनी निवडणूकीतील गलिच्छ राजकारण, मतभेद, त्यातून निर्माण होणारी ईर्षा, मतदानावेळी होणारी गद्दारी प्रत्यक्ष अनुभवली. या सर्व अपप्रकारावर मात करत त्यांनी संघटना पुरुस्कृत पॅनेलला १००% यश मिळवून दिले. या सर्व प्रकारातून आपल्या विभागाची, कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांसाठी निःस्वार्थ भावनेने चालवलेली स्वतंत्र पतसंस्था असावी, कर्मचाऱ्यांना संचालक मंडळावर स्थान मिळावे, त्यांच्या ठिकाणी असणारी हुशारी व प्रशासकीय कुशलतेच्या गुणांना प्रेरणा मिळावी, कर्मचाऱ्यांना वेळेवर कर्ज मिळावे हे विचार, संघटनेचे तत्कालीन उपाध्यक्ष श्री शब्बीर शेख, स्वीय सहाय्यक, यांच्या डोक्यात घोंगावू लागले. आणि तेथेच संस्था स्थापनेचे बीज रुजू लागले.

संस्थापकांनी आपल्या निवडक सहकाऱ्यांना आपला विचार सांगितला आणि पटवून दिला. आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन मुख्य प्रवर्तक म्हणून प्रत्यक्ष संस्था नोंदणीच्या कामास सुरुवात केली. समविचारी आणि संस्था स्थापनेच्या कामात मदत करणाऱ्या, पाठिंबा देणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून प्रवर्तक संचालक निवडले आणि

आवश्यक असणारे सभासद गोळा करणेस सुरुवात केली.

प्रशासनाने स्वतंत्र संस्था स्थापन करणेस विरोध केला, विविध कारणे दाखवून भिती दाखविली, दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांस न जुमानता मुख्य प्रवर्तकांनी आपले प्रयत्न चालूच ठेवले. संस्था स्थापनेबाबतची पहिली गोपनिय सहविचार सभा तांदूळ आळीत असलेल्या सौ. सायगांवकर यांच्या वाड्यात घेणेत आली.

मुख्य प्रवर्तकांचे धाडस, प्रवर्तक संचालकांचे सहकार्य आणि कर्मचाऱ्यांचा पाठिंबा असल्यामुळे संस्था नोंदणीसाठी आवश्यक असणारी सभासद संख्या केवळ तीन महिन्यातच पूर्ण करून सहकार खात्याकडे नोंदणीसाठी प्रस्ताव दाखल केला. नोंदणी पत्र प्राप्त करण्यासाठी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करावयाचा नसलेमुळे नोंदणीचे काम खूपच जिकीरीचे होते. प्रस्तावात सहकार खात्याने काढलेल्या त्रुटींची पुर्तता केली. सर्व पुर्तता करूनही नोंदणी काही मिळेना. त्यासाठी इतर काही गैर, अनैतिक गोष्टींचा अवलंब करणे प्रवर्तकांच्या बुध्दीला पटेना. त्यामुळे इतर मार्गांनी प्रयत्न करणे सुरू झाले. त्या कामात तत्कालिन जिल्हा सरकारी वकील श्री. सानप साहेब आणि जावलीचे आमदार मा. शशिकांत शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्व गोष्टींचे साफल्य म्हणजे २ फेब्रुवारी २००२ रोजी संस्थेस नोंदणी पत्र प्राप्त झाले आणि संस्थेचे प्रत्यक्ष कामकाज सुरु करणेत आले.

जिल्हा न्यायालयाचे राजवाड्यातून नविन इमारतीत स्थलांतर झाले त्यावेळी संस्थापक अध्यक्ष आणि संचालक यांच्या सहयोगाने नविन इमारतीमध्ये संस्था कार्यालयासाठी एक खोली प्रशासनाकडून मिळविण्यात आली.

संस्थेचे सर्व कार्यालयीन कामकाज; रोज किर्द, खतावणी लिहिणे, ताळेबंद तयार करणे, मागणी पत्र तयार करणे इत्यादी कामकाज पहिले चार पाच वर्षे, मुख्य प्रवर्तक यांनी स्वतः पाहिले. संस्थेचा आलेला भरणा स्वीकारणे, त्यांना पावती देणे, कर्जाचे अर्ज स्वीकारणे, कर्जदार सभासदांना धनादेश अदा करणे, मागणी पत्रके तालुक्यांना रवाना करणे इत्यादी कामे कार्यकारी संचालक श्री संजय नडे यांनी पाहिले. तर बँकेत रोख भरणा करणे, चेक जमा करणे, वेळोवेळी पासबुके भरुन आणणेचे काम तत्कालीन हेड बेलिफ श्री. भिकू कदम यांनी आपापल्या पदाचा कार्यभार सांभाळून विनामोबदला आपलेपणाने व समर्पण भावनेने पार पाडले.

प्रत्यक्ष कामकाज करताना पारदर्शीत्व आणि खर्चात काटकसर यांना सुरुवातीपासूनच महत्व देणेत आले. संचालक मंडळाने नाव व प्रसिध्दी साठी काम न करता त्याग व समर्पण भावनेने काम करावे हा संस्थापक अध्यक्षांचा आग्रह होता.

संचालक मंडळाच्या मासिक सभेत चहा–पान आणि अल्पोपहाराच्या खर्चाचा भार संस्थेवर व पर्यायाने सभासदांवर नसावा या उद्देशाने प्रस्तुतचा खर्च संचालकांकडून वर्गणी काढून करण्यात येत असे. संस्थापकांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन सर्व संचालकानी मासिक सभेच्या संचालकांना मिळणाऱ्या भत्यांचाही कायम स्वरुपी त्याग केला. ही गोष्ट संस्थेसाठी खुप महत्वाची आहे. आजही प्रवर्तक संचालकांच्या नांवाचा फलक संस्थेत कोठेही पहावयास मिळणार नाही.

संस्था स्थापनेसाठी लागणारा खर्च जमा झालेल्या सभासदांच्या वर्गणीतून न करता प्रवर्तक संचालकांनी वर्गणी काढून केला. फेब्रुवारी २००२ मध्ये नोदंणी झाल्यानंतर मार्च २००२ मध्ये संस्थेस ताळेबंद व नफातोटा पत्रक सादर करावे लागले. या एक महिन्याचे अवधीत कर्जवाटप न करताही संस्थेने त्यावर्षी रुपचे ३०००/– चा नफा नोंदविला. ही बाब सहकाराच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहावी अशीच आहे.

संस्थेस लागणारे सर्व साहित्य देणगी स्वरुपात गोळा करणेत आले. प्रवर्तक संचालक श्री मिलिंद मोटे यांनी कपाट, प्रवर्तक संचालक कै. दिलीप निकम यांनी टेबल, प्रवर्तक संचालिका सौ. शुभदा गोसावी यांनी चहाचा थर्मास, प्रवर्तक संचालिका सौ. अपर्णा कुलकर्णी यांनी माईक सिस्टीम संस्थेस देणगी स्वरुपात भेट दिली. इतकेच नाही तर संस्थेबद्दल वाटणाऱी आस्था व आपुलकीमुळे संस्थेचे सभासद श्री दत्तात्रय फरांदे, व श्री समद सय्यद, वाहन चालक यांनी खुच्या खुर्च्या भेट दिल्या. या सर्वांच्या त्यागा मुळे संस्था अव्याहतपणे प्रगतीपथावर राहिली.

संस्थापक अध्यक्षांनी प्रवर्तक संस्थापक आणि प्रवर्तक संचालकांचा कालावधी संपल्यानंतर कर्मचाऱ्यांना संधी मिळावी या उद्देशाने पुन्हा प्रवर्तक संचालक मंडळाला संधी न देता कर्मचाऱ्यांच्या हाती सत्ता सोपवली.

संस्थापक अध्यक्ष श्री शब्बीर शेख, प्रवर्तक संचालकः श्री. चित्रसेन शिंदे, श्री. सुरेश शिंदे, श्री. सुधीर माजगांवकर, श्री. मिलिंद मोटे, श्री. सोपानराव जाधव, कै. दिलीप निकम, सौ. शुभदा गोसावी, सौ. अपर्णा कुलकर्णी, श्री. शिवाजी इंगळे, श्री. बुध्दानंद वाघमारे आणि कार्यकारी संचालक श्री. संजय नडे यांचे संस्थेच्या उभारणीत आणि जडणघडणी मध्ये महत् योगदान लाभले. संस्था आणि सभासद सतत त्यांचे ऋणी राहील.

धन्यवाद ! जय हिंद, जय महाराष्ट्र !